# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१६/०९/२०१८
## दि.१५/०९/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ४०४/१८,भादविक ३०२,२०१,१४३,१४७,१४८,१४९,३६४,३४३,३२३,५०४ ५०६(२) |
| **फिर्यादी** | दिगंबर जाखडे, पो.उप.निरी. प्रॉपर्टी सेल,गुन्हे शाखा पुणे शहर |
| **आरोपी** | १.मनोज भाऊसाहेब पाडळे,वय-३० वर्षे,रा.विकासनगर,वडगाव-बुद्रुक,पुणे (अटक) व इतर सहा इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/०९/२०१४ रोजी १९/०० ते १७/०९/२०१४ रोजी २४/०० वा.चे दरम्यान भुमकर कॉम्प्लेक्स,कॉलेज चौक,न-हे,पुणे व अभिनव कॉलेज मागे डोंगर उतारा जवळ न-हे,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम मनोज भाऊसाहेब पाडळे,वय-३० वर्षे,रा.विकासनगर,वडगाव-बुद्रुक,पुणे याने दत्तवाडी पोस्टे मनुष्य मिसिंग नं.२०५/२०१४ मधील मुलगा विनायक विलास चव्हाण,वय-१८ वर्षे यास आरोपी बाबतची माहीती प्रतिस्पर्धी गुन्हेगारास देत असल्याचे कारणावरुन त्याने संगनमताने चिडुन जावुन,त्याचे हात-पाय बांधुन,लाथा-बुक्यांनी व स्नुकर स्टीकच्या सहाय्याने मारहाण करुन,तसेच चाकुने त्याचे शरिरावर ठिक-ठिकाणी वार करून,त्याचा गळा चिरुन विनायक चव्हाण यास ठार मारुन,पुरावा नष्ट करण्याचे उदेशाने त्यास खडयात पुरुन टाकले तसेच मयताचे साक्षीदार यास तीन दिवस अटकाव करुन ठेवुन,सदरची बाब ही कोणास सांगितल्यास जीवे ठार मारण्याची धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. निकम, प्रॉपर्टी सेल,गुन्हे शाखा,पुणे शहर ८३८००९६२०७ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे १६४/१८,भादविक ३८४,३८५,५०६(१),माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-१९,रा.पुणे |
| **आरोपी** | सुबोजित अभिजीत दासगुप्ता,वय-२९,रा.संदेश सिटी,बीसीए जामठा,नागपुर (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे ऑगस्ट - २०१८ ते सप्टेबर - २०१८ रोजीचे कालावधीत एरंडवणा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद सुबोजित अभिजीत दासगुप्ता,२९रा.संदेश सिटी,बीसीए जामठा नागपुर याने फिर्यादी यांचे मोबाईल फोनवर टिंडर ॲपवरती करण ऑबेरॉय नावाचे फेक अकाऊंन्ट तयार करुन,त्यांचेबरोबर चॅटींग, फोन व प्रपोज करुन,तीचेकडुन वेळोवेळी ३६,०००/- रुपये पेटीएम व बॅक खात्यावरुन घेवुन,फिर्यादीस लग्नाचे आमिष दाखवुन,तीचेकडे १०,०००/- रुची मागणी करुन,त्यांचे फोटो वायरल करण्याची धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) अरूण आव्हाड ९८२३३३३५५६ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे १८९/१८,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | मकरंद कुलकर्णी,वय-५७,रा.कर्वेनगर,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात व्यक्ती |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०९/२०१८ ते दि.१३/०९/२०१८ रोजी दरम्यान फिर्यादी यांचे बॅकेचे खात्यातुन कर्वेनगर पुणे येथे ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे बॅकेचे डेबीट कार्ड त्यांचे ताब्यात असताना,कोणीतरी नमुद अज्ञात व्यक्तीने फिर्यादी यांचे बॅकेचे खात्यातुन त्यांचे समतीशीवाय एकुण १,०१,६०२/- रुपये काढुन घेवुन,फिर्यादी यांची नमुद रकमेची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) जाधव ८८८८३११२३४ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे २४१/१८,भादविक २७९,३५३,५०४,४२७ ,मो.वा.का.क. १८४ |
| **फिर्यादी** | अमित जमदाडे, पो.कॉ. विश्रामबाग वाहतुक विभाग,पुणे शहर |
| **आरोपी** | विवेक विजय काकडे,वय-२७,रा.वडारवाडी,पांडवनगर,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/०९/२०१८ रोजी ११/५० वा. झेडब्रिज चौक, पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व साक्षीदार असे नमद ठिकाणी वाहतुकीचे नियमन व नियंत्रण करून, वाहतुकीचे नियम मोडणारे वाहन चालङ्कां विरोधात दंडात्मक कारवाईचे शासकीय कर्तव्य बजावीत असतांना,डेक्कन बाजुकडुन केळकर रोडकडे येणा-या झेड ब्रिजच्या मार्गावरुन मोपेडवरील चालक विवेक काकडे हा त्याचे ताब्यातील मोपडवर भरधाव वेगाने विना हेल्मेट व मोबाईलवर संभाषण करीत चालवित असतांना मिळुन आल्याने,फिर्यादी हे त्यांचेवर कारवाई करीत असतांना सदर इसमाने फिर्यादीस अश्लिल शब्द वापरून,तुला काय अधिकार लायसन्स मागण्याचा नाही आहे,देत नाही लायसन्स काय करतो बघतो,मी वडारवाडीचा भाई आहे,तुला काय करायचे ते कर असे म्हणुन,सदर ठिकाणी चौकात गोंधळ घालुन,फिर्यादी यांचे शर्टाची कॉलर धरुन,त्यांना ढकलुन,त्यांचे गणवेशाची व्हिसल कॉर्ड खेचुन,ती तोडुन तीचे १००/- रुपयाचे नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.बी.पाटील ९८९२७५३३७४ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ४०७/१८,भादविक ३५३,३२३,५०४,५०६,३४,मोव्हेॲक्ट ११२/११७ |
| **फिर्यादी** | गोरखनाथ चिनके,पो.शि. सिंहगड रोड पोस्टे पुणे शहर |
| **आरोपी** | १.मयुर बापु हांडे,वय-२३ वर्षे,रा.कुटे मळा,मानाजीनगर,न-हे,पुणे (अटक) व एक महिला |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/०९/२०१८ रोजी १९/०० वा. न-हे पोलीस चौकी सिंहगड रोड पुणे येथे |
| **तपशिल** | यातील मयुर बापु हांडे,वय-२३ वर्षे,रा.कुटे मळा,मानाजीनगर,न-हे,पुणे याने मानाजीनगर या परिसरांत लोकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण करून,दहशत निर्माण करीत असताना त्यास न-हे पालीस चौकीत चौकशी कामी आणुन त्याचेकडे चौकशी करीत असता,त्याने फिर्यादीस आत्महत्या करण्याची धमकी देवुन,नमुद महिला हिने फिर्यादी व कर्तव्यावरील असणारे पो.उप.निरी.पाटील मॅडम यांना अपशब्द वापरुन,त्यांचे अंगावर धावुन,त्यांना ढकलुन देवुन,ते करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. घाडगे ९४०३४४२०३३ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ५५१/१८,भादविक ३८० |
| **फिर्यादी** | दिपक शिवनगी,वय-४० वर्षे,रा.सोमवार पेठ,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे मार्च २०१८ ते दि.१४/०९/२०१८ दु.१२/०० वा. पर्यंतचे कालावधीत स्वप्निल स्टोन क्रेशर सनं.३८/१/१,येवलेवाडी,कोंढवा-बुद्रुक,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे महावितरण विभाग,मंगळवार पेठ शाखा कार्यालय,पुणे येथे सहा.अभियंता या पदावर नोकरीस आहेत. महावितरण विभागाने स्वप्निल स्टोन क्रेशर सनं.३८/१/१,येवले वाडी,कोंढवा-बुद्रुक,पुणे येथे बसविलेले इलेक्ट्रीक ट्रान्सफार्मरचे बॉडी कॉपरचे ३५० किलो कोर,वायडींग व ऑईल असा एकुण ६८,०००/- रू किंचा ऐवज अज्ञात चोरटयाने चोरुन नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.हवा.गुजले ९८२३२५४६५१ |

## दि.१६/०९/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो स्टे २३३/१८,भादविक २७९,३३८,मोव्हेॲक्ट ११२/११७ |
| **फिर्यादी** | राजु मशाक शेख,वय-२६,रा.सुपर बिबवेवाडी,पुणे |
| **आरोपी** | अंबुज कुमार सुरजचंद्र सिन्हा,वय-४०,रा.कुमार पामक्रेस्ट सोसा.पिसोळी,ता.हवेली,जि.पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/०९/२०१८ रोजी १९/०० वा.अपर कोंढवा रोडवर अपर इंदिरानगर बिबवेवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील कार ही हयगयीने व अविचाराने चालवुन हॅण्डब्रेक न लावता अगर इतर कोणतीही काळजी न घेता निष्काळजीपणाने रोडवर पार्क करून,फिर्यादी यांचे पुतणे १.अरमान नबीरसुल शेख,वय-११ वर्षे २.आयान मेहबुब शेख,वय-०९ वर्षे यांना गंभीर जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. बी.आर.आडके |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**